## नि.क्र. ०५ वरिल आदेश

अर्ज नि.क्र. ५, जबाब नि.क्र. १८ वर कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५, अंतर्गत कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी व निवास आदेशाकरीता दाखल केला आहे. अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे की, अर्जदार क्र. ०१ चे गैरअर्जदार क्र. ०१ सोबत धर्मातील रितीरिवाजानुसार दि. ०७/०९/२०२२ रोजी चंडीकापुर येथे झाला होता. अर्जदार क्र. ०१ व गैरअर्जदार क्र. ०१ यांचे पती–पत्नीचे लग्नसंबंध अद्याप कायम आहे. सदरहु लग्नसबंधातुन त्यांना एक मुलगा आहे.

२. अर्जदार क्र. ०१ लग्नानंतर गैरअर्जदार क्र.०१ यांच्याकडे नांदण्याकरीता गेल्या असता गैरअर्जदारांनी लग्नाचे सुरूवातीचे १५ ते २० दिवस चांगले नांदविले व त्यानंतर गैरअर्जदार क्र. ०२ व ०३ हे घरातील क्षुल्लक कारणावरून त्रास देऊ लागले. तसेच गैरअर्जदार क्र. ०२ व ०३ हे गैरअर्जदार क्र. ०१ ला अर्जदार क्र. ०१ विरूध्द भडकावुन देत होते व त्यांच्या सांगण्यावरून गैरअर्जदार क्र. ०१ हा अर्जदाराचा शारिरीक व मानसिक छळ करत होते. तसेच अर्जदार ०१ हिच्याशी कधीही प्रेमाने बोलत नव्हता व तिच्याकडे दुर्लक्ष करीत होता. गैरअर्जदार क्र. ०२ व ०३ हे अर्जदार क्र. ०१ ला सतत शारीरीक व मानसिक त्रास देवुन तुझ्या आई–वडीलांनी लग्नात आमची कोणतीही सोय केली नाही व कोणताही मानपान दिला नाही. आमच्याभरोशावर तुझ्या आईने लग्न केले असे म्हणुन सतत हिनवत होते. गैरअर्जदार क्र. ४ मनोरूग्न असल्यामुळे ती सतत अर्जदार क्र.०१ सोबत वाद घालत होती. तसेच गैरअर्जदार क्र. ०५ व ०६ यांना अर्जदार हि पसंत नसल्यामुळे दोघीही लग्नात देखील आल्या नव्हत्या. त्या अर्जदार ०१ व गैरअर्जदार क्र. ०१ यांच्यामध्ये गैरसमज निर्माण करून भांडण लावत होते. तसेच गैरअर्जदार क्र. ०१ चे दुसऱ्या मुलीसोबत लग्न लावुन देण्याच्या धमक्या देत होते.

३. अर्जदार क्र. ०१ हि पहिल्या दिवाळीला माहेरी आली असता तिने तिला होत

असलेल्या त्रासाबाबत तिच्या नातेवाईकांना सांगीतले असता अर्जदार क्र. ०१ च्या नातेवाईकांनी गैरअर्जदार क्र. १ यास समजावुन सांगितले असता गैरअर्जदार क्र.०१ यांनी यापुढे अर्जदाराला त्यांच्यापासुन त्रास होणार नाही व आम्ही वेगळे राहु असे कबुल केले होते. गैरअर्जदार क्र. ०५ व ०६ ह्या गैरअर्जदार क्र. ०१ ला खोटेनाटे सांगुन अर्जदार क्र. ०१ विरूध्द भडकावत होत्या. अर्जदार क्र. ०१ ला दि. १७/०८/२०२३ रोजी रूद्र नावाचा मुलगा झाला. सरकारी दवाखान्यात प्रसुती केल्यामुळे त्यांचा अपमान झाला असे म्हणुन त्यांनी पुन्हा वाद केला व अर्जदाराच्या आईला मारहान करून निघुन गेले. तेंव्हापासुन अर्जदार हि तिच्या मुलासह माहेरी राहु लागली. गैरअर्जदार क्र. ०१ याचे यापूर्वी लग्न झाले असल्याबाबत त्यांनी अर्जदार व तिच्या नातेवाईकांपासुन लपवुन ठेवले आहे त्यामुळे अर्जदार हिची सर्व गैरअर्जदार यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. अर्जदार क्र. ०१ मुलासह गैरअर्जदार क्र.०१ याच्यासोबत नांदण्यास तयार असुन सुध्दा गैरअर्जदार याने कोणतेही सबळ व संयुक्त कारण नसतांना अर्जदार क्र.०१ व त्यांच्या मुलाचा त्याग केला त्यामुळे अर्जदार क्र.०१ ह्या त्यांच्या मुलांसह नाईलाजास्तव त्यांच्या माहेरी आईच्या भरोशावर जीवन जगत आहे. अर्जदार क्र. ०१ गरीब स्त्री असुन त्यांची आर्थीक परिस्थीती प्रतिकुल असुन त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यांच्या उदरनिर्वाहाची कोणतीही व्यवस्था गैरअर्जदार क्र. ०१ यांनी केलेली नाही.

४. गैरअर्जदार क्र.१ यांच्या नावावर मौजे चंडीकापुर येथे गट क्र. १०५ नुसार अडीच एकर बागायती शेती असुन सोबत गैरअर्जदार क्र. ०१ च्या आईच्या व वडीलांच्या नावावर देखील साडे सहा एकर शेती आहे. सदर शेतीतुन गैरअर्जदार यांना दरवर्षी खर्च वजा जाता जवळपास रू.५,००,०००/– उत्पन्न मिळते. तसेच सोबत गैरअर्जदार क्र. ०१ याच्या मालकीचा ऑटो असुन त्यातुन देखील गैरअर्जदार क्र. ०१ याला दररोज जवळपास रू. १,०००/– ते रू. १,५००/– उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र. ०१ यांच्यावर अर्जदार क्र. १ व २ व्यतिरीक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही. तसेच गैरअर्जदार त्याच्यावर असलेली नैतिक व कायदेशीर जबाबदारी टाळत असल्यामुळे अर्जदार क्र. १ व २ यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. अर्जदार क्र. १ व २ चे पालनपोषण करण्याची सर्वस्वी जबाबदारी गैरअर्जदार क्र. ०१ ची असताना देखील त्याने दुर्लक्ष केले आहे. त्याने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची कोणत्याही

प्रकारची तजविज केली नाही, त्यामुळे त्यांच्यासमोर गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे अर्जदार क्र. ०१ ला दरमहा रू. १५,०००/–व अर्जदार क्र. २ ला दरमहा रू. १०,०००/– अंतरीम खावटीची मागणी केली आहे.

५. याउलट गैरअर्जदार यांनी सदरील आरोप खोटे असल्याचे सांगून अमान्य केले. अर्जदार क्र ०१ हि गैरअर्जदार क्र. ०१ ची पत्नी असल्याचे त्यांनी मान्य केले. त्यांच्या कथनाप्रमाणे लग्न झाल्यावर अर्जदार क्र. ०१ हि फक्त एक महिणाच चांगली राहिली. नंतर गैरअर्जदारासोबत, त्यांचे आई–वडीलासोबत व बहिणीसोबत क्षुल्लक कारणावरून, कामधंद्यावरून भांडणतंटा करीत होती व काही काम न करता दिवसभर झोपत होती. गैरअर्जदार क्र. ०१ याने कामधंद्याबद्दल व झोपण्याबद्दल म्हटले असता ती गैरअर्जदाराला मोठया आवाजात बोलुन नेहमी धमकावत होती. अर्जदार क्र. ०१ आजारी नसतांना सुध्दा गोळया घेत होती. गोळया घेण्याबद्दल विचारले असता त्याचे कारण त्यांनी सांगितल नाही. अर्जदार क्र. ०१ हि त्यांना दुसरीकडे राहण्यासाठी नेहमी तगादा लावत होती. गैरअर्जदार क्र. १ वर त्यांच्या कुटुंबातील ४ ते ५ लोकांची जबाबदारी आहे. गैरअर्जदार क्र. ०१ चे आई–वडील म्हातारे असल्यामुळे त्यांना दिसत नाही. ते कोणताही कामधंदा करू शकत नाही. गैरअर्जदारावर व त्यांच्या वडीलावर बहिणीच्या लग्नाची बरेच वर्षे सावकाराचे व बॅकेचे कर्ज असल्यामुळे गैरअर्जदार हा अर्जदार क्र. ०१ ला दरमहा रू. १५,०००/– व अर्जदार क्र.०२ ला दरमहा रू. १०,०००/– देवु शकत नाही. ते अतिशय गरीब असुन त्याचेजवळ अडीच एकर शेती व्यतिरीक्त उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही त्यामुळे तो अर्जदाराला खावटी देवु शकत नाही. अर्जदाराने केलेला अर्ज खोटा असुन अर्जातील कोणतीही घटना खरी नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली आहे.

६. अर्जदार क्र. ०१ ही गैरअर्जदार क्र. १ ची पत्नी व अर्जदार क्र. ०२ मुलगा असल्याची बाब गैरअर्जदार क्र. ०१ यांने नाकारली नाही. गैरअर्जदाराने केलेले प्रत्यारोप

सुनावणी दरम्यान विचारात घेता येतील. अंतरिम पोटगीसाठी अर्जदार क्र. ०१ ने शपथेवर केलेले कौटुंबिक हिंसेच्या कथनाला कौटुंबिक घटना अहवाल पुष्टी देतो त्यामुळे उपरोक्त कौटुंबिक हिंसाचाराबद्दल त्यांचे कथन सध्या ग्राहय धरावे लागेल. परिणामी गैरअर्जदारांकडुन अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाला ही बाब प्रथमदर्शनी ग्राहय धरण्यात येते .

७. गैरअर्जदार क्र. ०१ ने त्याच्याकडे अडीच एकर शेती असल्याची बाब मान्य केली असुन त्याबाबत ७/१२ उताऱ्याची प्रत अभिलेखावर दाखल आहे. त्यांच्यावर आई-वडीलांची जबाबदारी आहे, हि बाब जरी मान्य केली तरीही अर्जदारांना सांभाळण्याची त्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी आहे. अर्जदार ह्या सध्या त्यांच्या मुलासह माहेरी आश्रयाने राहत असुन त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी गैरअर्जदार क्र. १ टाळु शकत नाही. म्हणुन उपरोक्त विवेचनावरून गैरअर्जदार क्र. १ अर्जदार यांना वेगळी पोटगी देण्यास समर्थ आहे असे ग्राहय धरण्यात येते.

८. प्रस्तुत प्रकरणाचे स्वरूप व अर्जदाराच्या दैनंदिन गरजा तसेच गैरअर्जदार क्र. १ यांचे राहणीमान विचारात घेता अर्जदार क्र. १ ला दरमहा रू.१,५००/- व अर्जदार क्र. २ ला दरमहा रू.१,०००/- पोटगी रकमेची गरज पडेल असे ग्राहय धरत आहे. करीता गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदाराला वर उल्लेखित केल्याप्रमाणे पोटगी द्यावी असा आदेश करणे या टप्प्यावर योग्य ठरेल.

९. वर दिलेले निष्कर्ष हे पूर्णत: प्रथमदर्शनी प्रकरण पाहुन अंतरिम अर्जावर दिलेले आहेत, त्याचा कुठलाही परिणाम मुळ अर्जाच्या गुणवत्तेवर पडणार नाही. अर्जात केलेल्या सर्व मागण्या, मुळ अर्जाच्या सुनावणीदरम्यान विचारात घेतल्या जातील. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज (नि.५) अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र. १ याने अंतरिम अर्जाच्या दिनांकापासून अर्जदार क्र. १ ला दरमहा रू.१,५००/-(अक्षरी दिड हजार रूपये) व अर्जदार क्र. २ ला रू.१,०००/- (अक्षरी एक हजार रूपये)इतकी अंतरिम पोटगी मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यत द्यावी.

३. आदेशाच्या प्रती दोन्ही पक्षांना विनाखर्च देण्यात याव्या.

Digitally signed by PRITI DNYANESHWAR MENDHE
Date: 2026.03.24 12:39:32 +0530

( श्रीमती प्रिती डी. मेंढे )
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
जळगांव जामोद. जि. बुलडाणा.

ठिकाणः जळगांव जामोद.
दिनांकः १७/०३/२०२६.

**प्र मा ण प त्र**

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशातील मजकुराशी शब्दांशब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावः– दिपक के. मतकर, लघुलेखक श्रेणी–३.

कोर्टाचे नावः– दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, जळगाव जामोद.

दिनांकः– २४/०३/२०२६.